

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६







प्रिय शिक्षक बंधू-भगिनींनो,
सस्नेह नमस्कार!

राजमाता जिजाऊंचे संस्कार, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि स्वामी विवेकानंदांचे विचार हे शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे प्रेरणादीप आहेत. स्त्री-शिक्षणाचे उद्‌गाते महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यासारख्या महान शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी शिक्षकांच्या खांद्यावर आहे. हाच वैचारिक आणि शैक्षणिक परंपरेचा वारसा जपण्याचा माझा संकल्प आहे.



पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीसाठी भाजपा-महायुतीचा मी अधिकृत उमेदवार आहे. ही संधी दिल्याबद्दल मी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा, राष्ट्रीय अध्यक्ष नितीनजी नबीन, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, राज्याचे ज्येष्ठ मंत्री चंद्रकांतदादा पाटील, यांसह सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांचे मनापासून आभार मानतो. भारतातील शिक्षणव्यवस्थेला गेल्या दशकात नवा आयाम लाभला. उच्च शिक्षणाच्या अनेक संधी नव्याने निर्माण झाल्या. त्याचबरोबर भारतीय ज्ञानपरंपरेला शिक्षणात एक सन्मानाचे स्थान लाभले. नवे शैक्षणिक धोरण आले. अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या परीक्षा आपल्या मातृभाषेतून देण्याची सुविधा निर्माण झाली. डिजिटल शिक्षणावर मोठा भर देण्यात आला आहे. ही गती कायम राखण्यासाठी शिक्षकांना ताकद देण्याची गरज आहे. त्यांच्या समस्यांवर संवेदनशीलतेने मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. याचसाठी वचनबद्ध होऊन मी या निवडणुकीत उतरलो आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि शिक्षक म्हणून कार्यरत असताना शिक्षक, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक आणि शैक्षणिक प्रशासनाबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. त्यातून शिक्षकांच्या समस्यांविषयी सखोल आकलन झाले आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील विविध शिक्षक संघटना, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षण संस्था आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद व जिव्हाळ्याचे संबंध मी जोडले आहेत. विचार वेगवेगळे असले, तरी शिक्षकांच्या हितासाठी एकजूट आवश्यक आहे. शिक्षकांच्या सर्व संघटनांना विश्वासात घेऊन, त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करून शासनदरबारी ते प्रभावीपणे मांडण्यासाठी एक व्यापक आणि सर्वसमावेशक शिक्षक व्यासपीठ उभे करण्यासाठीही मी कटिबद्ध आहे. शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा घटक नसून, समाजाच्या वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रमुख आधारस्तंभ आहे, हा माझा ठाम विश्वास आहे. विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, बंधुभाव आणि सामाजिक जाणिवेची भावना शिक्षकच निर्माण करतो. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार असून, तो समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावतो. या ठाम विचाराने शिक्षकांच्या हक्कांसाठी आणि मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी माझी वाटचाल सुरू आहे. शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणे, हेच माझे ध्येय आहे.यासाठी आपली साथ हवी आहे, ती तुम्ही द्याल, हा विश्वास आहे.



आपला,
शिक्षकमित्र कौस्तुभ मुरलीधर गावडे

शिक्षकांचे हित हाच माझा संकल्प

१ जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणार.

२ **दीर्घकाळ सेवा बजावलेल्या शिक्षकांच्या सेवा सुरक्षेला बाधा न आणता TET सक्ती रद्द करणे, आवश्यक प्रशिक्षण आणि उपाययोजनांसाठी प्रयत्न करणार.**

३ रिक्त झालेली पदे वेळेत भरली जाण्यासाठी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रिया वर्षभर नियमितपणे सुरू राहण्यासाठी पाठपुरावा करणार.

४ **शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती आणि आवश्यक विशेष शिक्षकांच्या नियुक्तीसाठी प्रभावी पाठपुरावा करणार. विशेषत: गणित, विज्ञान, इंग्रजी, संगणक, कला, क्रीडा आणि व्यावसायिक विषयांतील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यावर भर देणार.**

५ अनुदानास पात्र संस्था व वाढीव तुकड्यांना वेळेत अनुदान मिळण्यासाठी पाठपुरावा करणार. पात्र संस्थांना एकसमान १००% पूर्ण अनुदान मिळविण्यासाठी आग्रही राहणार.

६ **शिक्षकांवरील अनावश्यक अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्यासाठी प्रयत्न करणार.**

७ 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'च्या अंमलबजावणीमुळे त्याचा थेट परिणाम प्राध्यापक पदसंख्येवर होऊ नये, यासाठी प्राध्यापकहिताचा समतोल राखणारे धोरण व योग्य मनुष्यबळ नियोजनासाठी पाठपुरावा करणार.

८ **कनिष्ठ महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेतील अडचणींचा अभ्यास करून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्यासाठी पाठपुरावा करणार.**

९ आश्रमशाळांमधील इमारत, स्वच्छता, पाणी, निवास, शैक्षणिक सुविधा आणि इतर मूलभूत गरजांवर विशेष लक्ष देणार. २०२६ मध्ये प्रस्तावित/ घेतलेल्या Third-Party Audit संदर्भातील प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी व त्यातून सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणार.

१० **व्यावसायिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांच्या शिष्यवृत्ती वेळेत मिळविण्यासाठी पाठपुरावा करणार.**





शिक्षकांचा
बुलंद आवाज



आपला
हक्काचा माणूस

११ मासिक पाळीच्या काळात महिलांना गरजेनुसार विशेष रजा मंजूर करण्यासाठी आग्रह धरणार.

१२ **ITI instructors साठी Faculty Development, Training of Trainers आणि नवीन age courses या संदर्भातील सुरू असलेल्या कामांना गती मिळावी, उद्योगाभिमुख प्रशिक्षण वाढावे आणि विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्ये मिळावीत, यासाठी प्रयत्न करणार.**

१३ RTE अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शुल्काशी संबंधित शाळांना मिळणारे अनुदान निश्चित वेळापत्रकानुसार प्राप्त होण्यासाठी आग्रह धरणार.

१४ **शिक्षक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य विम्याची सुविधा कॅशलेस व्हावी, यासाठी पाठपुरावा करणार.**

१५ इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या पदवीप्राप्त D.Ed. धारक शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत पाठपुरावा करणार.

१६ **सी.एच.बी. प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यासाठी पाठपुरावा करणार.**

१७ त्रुटी पूर्तता केलेल्या शिक्षकांना अनुदान मिळवून देणार.

१८ **शिक्षण क्षेत्राला भ्रष्टाचारमुक्त करणार.**

१९ भारतीय ज्ञानपरंपरेच्या अभ्यासाला महत्त्व देण्याचा केंद्र सरकारचा निर्णय देशातील पारंपरिक शिक्षणव्यवस्थेचा सन्मान वाढविणारा आहे. जगाचे शैक्षणिक केंद्र हा भारताचा लौकिक प्रस्थापित करण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरणार आहे. हे प्राचीन ज्ञान शिक्षकांनी घेण्यासाठी आणि परंपरा आणि आधुनिकतेचा उत्तम संयोग असणारे विद्यार्थी घडविण्यासाठी विशेष पुढाकार घेणार.

२० **इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी पाठपुरावा करणार.**



शिक्षक हितासाठी कटिबद्ध





शिक्षकांसाठी झटणारे नेतृत्व





पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६

असे करा मतदान

- मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेसोबत पुरविलेले स्केच पेनच वापरावे. अन्य कोणते पेन, पेन्सिल, बॉलपॉईंट किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरू नये. असे केल्यास तुमची मतपत्रिका अवैध ठरेल.
- उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर | अशी उभी रेषा लिहून मतदान करा. ही | रेषा फक्त एकदाच उमेदवाराच्या नावासमोर लिहावी.
- कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर आपण एकच आकडा घातलेला आहे, याची खात्री करून घ्यावी. तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही, याचीदेखील खात्री करून घ्यावी. पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नये.
- पसंतीक्रमाचे आकडे भारतीय अंकाच्या 1, 2, 3, इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रूपात किंवा I, II, III इत्यादींसारख्या रोमन रूपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रूपात किंवा संविधानाच्या अनुसूची आठमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रूपामध्ये चिन्हांकित करता येतील.
- मतपत्रिकेवर मतदाराने आपले नाव, आद्याक्षरे किंवा अन्य शब्द लिहू नयेत किंवा स्वाक्षरी करू नये. तसेच आपल्या अंगठ्याचा ठसादेखील उमटवू नये. असे केल्यास आपली मतपत्रिका अवैध ठरेल.
- पसंतीक्रम दर्शविण्यासाठी तुमच्या निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर × किंवा ✓ अशी खूण करणे पुरेसे होणार नाही. अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. पसंतीक्रम फक्त आकड्यांमध्येच दर्शवावा.
- आपली मतपत्रिका वैध ठरण्यासाठी एकूण उमेदवारांपैकी एका उमेदवाराच्या नावासमोर | अशी उभी रेषा लिहून तुमची पहिली पसंती दर्शविणे आवश्यक आहे.

अशा मतपत्रिका अवैध ठरतील

| हा आकडा घातलेल्या नसल्यास. | हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला असल्यास. | हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी घातलेला आहे, याबाबत शंका निर्माण होईल अशा प्रकारे घातलेला असेल. एकाच उमेदवाराच्या नावासमोर | आणि त्याबरोबर २, ३ इत्यादी आकडेदेखील घातलेले असतील. पसंतीक्रम आकड्याऐवजी शब्दांमध्ये दर्शविलेला असेल. मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असले, आणि असे आकडे घालण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या स्केच पेनव्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा घातलेला असेल, तरी अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

कौस्तुभ मुरलीधर गावडे यांच्या नावासमोर पसंतीक्रम | लिहून प्रचंड बहुमताने विजयी करा!

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६

अ. क्र.	उमेदवाराचे नाव, पक्ष	उमेदवाराचे छायाचित्र	पसंतीक्रम
२	**कौस्तुभ मुरलीधर गावडे** भारतीय जनता पार्टी		I

मतदान : शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर, २०२६ | सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत

प्रकाशक : श्री. राजेश पांडे । मुद्रक : श्री मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर । प्रती : १०,००० । दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२६